महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१२वी/यो.प्र. Digilocker/1776
दि. १५/०९/२०२२.

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यक्षेत्र,
जिल्हे:- सातारा, सांगली व कोल्हापूर.

**विषय: सीबीएसई बोर्डाचे Authentic Migration Certificate on digilocker स्विकारणेबाबत.**
**संदर्भ:** **१)** राज्य मंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं./समकक्षता/५२६७, दि.१३-०९-२०२२ चे पत्र.
**२)** या कार्यालयाचे दिनांक:- क्र.कोविमं/योग्यता प्रमाणपत्र/१४७१, दि.१२ ऑगस्ट, २०२२ चे परिपत्रक.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (CBSE) मार्फत Digilocker with Digital Signature व्दारे प्राप्त होणारी स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) ग्राहय धरण्यास या वर्षासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि अशाप्रकारे प्राप्त होणा-या प्रस्तावाबाबत कनिष्ठ महाविद्यालयाना विद्यार्थ्यांकडून मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आणि मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत प्राप्त झाल्यावर कनिष्ठ महाविद्यालयांनी दि.१५ नोव्हेंबर,२०२२ पर्यंत मंडळ कार्यालयास जमा करण्याचे हमीपत्र योग्यता प्रमाणपत्र अर्जांच्या प्रस्तावासोबत सादर करावे. तसेच विद्यार्थ्यांचे मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रतही मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) सोबत सादर करावी. हमीपत्राचा नमुना या परीपत्रकासोबत देण्यात येत आहे. हमीपत्र सादर न केल्यास योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच मंडळाकडे प्रत्यक्षात अर्ज ज्या दिवशी जमा करणार आहे त्या दिवसापर्यंतचे जे शुल्क/फी लागू असेल ते मंडळात भरणा करावे लागेल याची नोंद घ्यावी.

मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आणि मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत प्राप्त झाल्यानंतरच योग्यता प्रमाणपत्राबाबत कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आणि मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत अभावी विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी. तसेच जर यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी आपल्यावर राहील याची नोंद घ्यावी.

( डी. एस. पोवार )
विभागीय सचिव,
म.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४

प्रत माहितीस्तव :-
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग,
हत्तीमहाल रोड, कोल्हापूर.

# हमीपत्र (नमुना)

प्रति,
मा. विभागीय सचिव,
म.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर-४

## हमीपत्र

आम्ही असे हमीपत्र देतो की, आमच्या कनिष्ठ महाविद्यालय क्र. J---------------------- कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव:------------------------------------------------------------------------------------------------------------------- मध्ये सन २०२२-२०२३ करिता इ.११वी / इ.१२वी मध्ये प्रवेश घेतलेल्या C.B.S.E. बोर्डाच्या एकूण -------------- विद्यार्थ्यांची मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आणि मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्राची साक्षांकीत छायाप्रत दि.१५ नोव्हेंबर,२०२२ पर्यंत म.रा.मा. व उ.मा. शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयाकडे जमा करणेची जबाबदारी आमची राहील. तसेच जर सदरची कागदपत्रे जमा न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक किंवा अन्य नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी आमची राहील याची हमी देत आहे.

कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक क्रमांक: J----------------------
कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव:------------------------------------------------------------------------------------------

दिनांक:-----------------------------------

आपला विश्वासू,

प्राचार्य स्वाक्षरी:------------------------------

प्राचार्य शिक्का:-

कनिष्ठ महाविद्यालय शिक्का:-